**पुणे मेट्रोमध्ये जागतिक महिलादिन साजरा**

आज जागतिक महिलादिनाचे औचित्य साधून महामेट्रोमधील सर्व कार्यालयांत महिला दिन मोठया उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी कोरोनाचे संकट असल्यामुळे कार्यक्रम ऑनलाइन पार पडला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नागपूर मेट्रोच्या वित्त विभागाच्या श्रीमती ठाकरे यांनी केले. यावेळी महामेट्रोचे महासंचालक डॉ. ब्रिजेश दीक्षित यांनी नागपूर येथील मुख्य कार्यालयातून व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून महामेट्रोच्या सर्व कार्यालयातील महिला कर्मचाऱ्यांची संवाद साधत त्यांना जागतिक महिला दिनाच्या शुभेच्या दिल्या. त्यांनी महिला कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन करत अधिक चांगले काम करण्यासाठी प्रोत्साहित केले. यावेळी महामेट्रोचे सर्व उच्च पदस्थ अधिकारी व्हिडीओ कॉन्फरसिंगच्या माध्यमातून उपस्थित होते

महामेट्रोच्या पुणे मेट्रो अंतर्गत कंत्राटी व कायमस्वरूपी अश्या एकूण ७१ महिला कर्मचारी विविध पदांवर कार्यरत आहेत. यात कार्यालयीन कामापासून मेट्रोच्या साईटवरील कामापर्यंतची जबाबदारी या महिला उत्तम प्रकारे पार पडत आहेत. महामेट्रोने आपल्या सर्व कार्यालयांमध्ये महिलांसाठी खुलेपणाचे व महिलांसाठी अनुकुल असे वातावरण ठेवण्याचा कायम प्रयत्न केला आहे. हे करत असताना सर्व महिलांना त्यांच्या पदाप्रमाणे योग्य ती जबाबदारी देऊन सामान संधी उपलब्ध करून दिली आहे.

महामेट्रोच्या सर्व विभागांमध्ये महिला कर्मचारी नियुक्त आहेत. स्थापत्य विभागात ४ महिला अभियंता, सिग्नल व टेलिकॉम विभागात ३ महिला अभियंता, विद्युत विभागात ४ महिला अभियंता, रोलिंग स्टॉक विभागात १ महिला अभियंता आणि टेंडर (प्रापण) विभागात ३ महिला कर्मचारी कार्यरत आहेत. या कर्मचारी अत्यंत सक्षमपणे मेट्रो बांधकाम जागांवर सुपरविजन कामे करत आहेत. याव्यतिरिक्त वित्त विभागात ३ महिला, मनुष्यबळ विभागात ४ महिला प्रशासन विभागात ४ महिला व विधी विभागात १ महिला कार्यरत आहेत.

या कार्यक्रमाला समाजातील विविध मान्यवर महिलांना आमंत्रित करण्यात आले होते. ऑनलाइन माध्यमातून यामध्ये डॉक्टर राजसी सेनगुप्ता यांनी महिलांच्या आरोग्यविषयक विषयावर माहिती सांगितली आणि श्रीमती सुनीता धोटे यांनी नुकत्याच आयर्न मॅन या जागतिक स्पर्धेमध्ये मिळवलेल्या यशाचे रहस्य सांगितले. महामेट्रोचे महासंचालक यांच्या पत्नी श्रीमती दीक्षित यांनी कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन केले.